जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ९०० दिनांक २१/०५/२०२०**

## फरासखाना पोलीस ठाणे पुणे शहर
## बुधवार पेठ वेश्यावस्ती मधील वारंगणा तसेच कमला नेहरु हॉस्पीटल जवळील कागदीपुरा येथे अन्नधान्याचे वाटप केलेबाबत...

कोरोना संसर्गजन्य रोगाचे पार्श्वभुमीवर पुणे शहरामध्ये दि. २२/०३/२०२० रोजी पासुन संचारबंदी लागु करण्यात आलेली असुन, फरासखाना पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्र हे कंटेनमेंट झोन म्हणुन जाहीर करण्यात आलेले आहे. त्यामुळे फरासखाना पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रातील अत्यावश्यक सेवा सोडुन संपुर्ण आस्थापना बंद आहेत. त्यामुळे बुधवार पेठ येथील वारंगणा यांचेवर उपासमारीची वेळ आलेली असल्याने साधु वासवानी मिशन, डेक्कन पोलीस मित्र संघटना व सकाळ रिपोर्टर यांचे वतीने प्राप्त झालेले ५२० अन्नधान्याचे किट बुधवार पेठ येथील वेश्यावस्ती मधील वारंगणा यांना दि. १९/०५/२०२० व दि. २०/०५/२०२० रोजी फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जगन्नाथ कळसकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा तावडे, व पोलीस उप निरीक्षक श्रीकांत सावंत यांनी वाटप केलेले आहे.

तसेच Nasscom Foundation यांचेकडुन प्राप्त झालेल्या अन्नधान्याचे पाकीटांपैकी ५० पाकीटे ही कमला नेहरु हॉस्पीटल जवळ असलेल्या कागदीपुरा या संसर्गजन्य बाधित क्षेत्रामध्ये गरजु लोकांना फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जगन्नाथ कळसकर, व पोलीस उप निरीक्षक यशपाल सुर्यवंशी यांनी वाटप केलेले आहे.

(जगन्नाथ कळसकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस ठाणे पुणे शहर


AJ-
Famous
Wallpapers
FURNISHINGS & MATTRESS
मे. पुरुषोत्तम महादेव रासने
P2